शेतकऱ्यांचा सातबारा कोरा आणि इतर मागण्या पूर्ण होई पर्यंत आम्ही शांत बसणार नाही : बच्चू कडू >>पान 2

श्री संत गजानन महाराज पालखीचे बिबी शहरात हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये भव्य जंगी स्वागत >>पान 3

रा.काँ. महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे यांच्याकडून जिल्हाध्यक्ष आरवाडे यांच्या कार्याचे कौतुक >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
जीवनात नेहमी पुढे जाण्याचा प्रयत्न करा.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034






रणबीर कपूर स्टारर रामायणमध्ये हा मराठमोळा अभिनेता साकारणार महत्त्वाची भूमिका
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 06 ■ शुक्रवार, दि. 25 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्यातील ३४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अवकाळी, गारपीटसाठी अनुदान मंजूर; राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर विभागातील ५० हजार १९४ बाधित शेतकऱ्यांसाठी ३४ कोटी ९१ लाख ६३ हजार रुपयांचा तर अमरावती जिल्ह्यातील ५४ हजार ७२९ शेतकऱ्यांना ६६ कोटी १९ लाख ११ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

राज्यात फेब्रुवारी ते मे २०२५ च्या दरम्यान राज्यातील विविध जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतीपिकांचं नुकसान झालं. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३३७ कोटी ४१ लाख ५३ हजार रुपयांचे अनुदानास वितरणास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकारने एकूण ३४ जिल्ह्यातील ३ लाख ९८ हजार ६०३ बाधित शेतकऱ्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर, हिंगोली, नांदेड, बीड, धाराशिव, जालना जिल्ह्यासह पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम, वर्धाम गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे.

नागपूर विभागातील ५० हजार १९४ बाधित शेतकऱ्यांसाठी ३४ कोटी ९१ लाख ६३ हजार रुपयांचा तर अमरावती जिल्ह्यातील ५४ हजार ७२९ शेतकऱ्यांना ६६ कोटी १९ लाख ११ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील ६७ हजार ४६२ शेतकऱ्यांसाठी ५९ कोटी ९८ लाख २० हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

तर पुणे विभागातील १ लाख ७ हजार ४६३ बाधित शेतकऱ्यांना ८१ कोटी २७ लाख २७ हजार रुपयांचा निधी वितरीत करण्यात येणार असून कोकण विभागातील १३ हजार ६०८ शेतकऱ्यांना ९ कोटी ३८ लाख २४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तर नाशिक विभागातील १ लाख ५ हजार १४७ बाधित शेतकऱ्यांना ८५ कोटी ६७ लाख ८ हजार रुपयांचा निधीला मान्यता देण्यात आली आहे. राज्य सरकार विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान देते. परंतु अलीकडेच राज्य सरकारने या अनुदानात कपात करत जुन्या दराने निविष्ठा अनुदान वितरणाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता



शेतकऱ्यांना २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान वितरीत करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी नाराज आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण अर्थात डीबीटीच्या माध्यमातून अनुदान वाटप करण्यात येणार आहे. अनुदानासाठी शेतकऱ्यांनी केवायसी करून घेणे आवश्यक आहे.

## राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे २० जिल्हाध्यक्ष शिवसेनेच्या वाटेवर



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे २० जिल्हाध्यक्ष शिवसेनेच्या वाटेवर असल्याचे वृत्त आहे. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी चर्चा केल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या २० जिल्हाध्यक्षांनी शिवसेना प्रवेशाची तयारी केल्याचे समजते. प्रा. जालिंदर पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'स्वाभिमानी'च्या जिल्हाध्यक्षांनी शिवसेना प्रवेशाची तयारी केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे जिल्हाध्यक्ष सांगत आहेत.

''शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेसोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न शासनाच्या मुख्य प्रवाहात आणता येतील. तसेच, विकासाच्या कामातही मदत होईल'', असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले. उदय सामंत यांच्या उपस्थितीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर हा निर्णय निश्चित झाला. लवकरच हे २० जिल्हाध्यक्ष शिवसेनेत प्रवेश करतील, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

महायुतीचे महामंडळांसाठीचे सूत्र निश्चित

महायुतीने महामंडळांसाठीचे सूत्र निश्चित केले आहे. भारतीय जनता पार्टीच्या वाट्याला ४४, शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या वाट्याला ३३ आणि अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला २३ महामंडळं आली आहेत.

## दहीहंडी उत्सवादरम्यान १.५ लाख गोविंदांच्या विम्याचा खर्च सरकार उचलणार, गोविंदाचा मृत्यू झाल्यास १० लाख देणार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या १.५ लाख 'गोविंदां'साठी विमा संरक्षण जाहीर केलंय. गोविंदाचा मृत्यू झाल्यास जास्तीत जास्त १० लाख रुपये दिले जाणार आहेत. उत्सवाच्या एक महिन्यापूर्वीच हा निर्णय घेण्यात आला आहे. जन्माष्टमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर दहीहंडी उत्सवादरम्यान गोविंदा (लहान मुले) मानवी मनोरे तयार करतात आणि उंचीवर टांगलेल्या दूध, दही आणि लोणीने भरलेली मटकी फोडतात. दहीहंडी उत्सवात नुकसान झालेल्या गोविंदांना सरकारच्या विमा योजनेचा फायदा होणार आहे.

विमा संरक्षणाचा खर्च सरकार उचलणार : बुधवारी जारी केलेल्या जीआरनुसार, यंदा १६ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या या उत्सवादरम्यान मानवी मनोरे तयार करून दहीहंडी लावणाऱ्या नोंदणीकृत सहभागींच्या विम्याचा खर्च राज्य सरकार उचलणार आहे. गोविंदांचे प्रशिक्षण, वय आणि सहभाग पडताळण्यासाठी आणि त्यांची माहिती पुणे येथील क्रीडा आणि युवा सेवा आयुक्तांना सादर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य गोविंदा संघाची नियुक्ती करण्यात आलीय. जीआरमध्ये अपघातांच्या सहा श्रेणी आणि त्यानुसार विमा देयकांचा उल्लेख आहे.

या ६ श्रेणी विम्यात समाविष्ट केल्या जाणार : दहीहंडी उत्सवादरम्यान मृत्यू झाल्यास मृत गोविंदाच्या कुटुंबाला १० लाख रुपये मिळतील. दोन्ही डोळे किंवा दोन अवयव गमावणे यांसारखं अपंगत्व आल्यासही हीच रक्कम दिली जाणार आहे. एक डोळा, एक हात किंवा एक पाय गमावलेल्या गोविंदाला ५ लाख रुपयांच्या भरपाईसाठी दिले जाणार आहेत. जीआरनुसार, अंशत: किंवा कायम चे अपंगत्व आल्यास विमा कंपनीच्या टक्केवारी आधारित अपंगत्वाच्या मानक श्रेणींनुसार भरपाई दिली जाणार आहे. याव्यतिरिक्त विमा योजनेत उत्सवादरम्यान झालेल्या दुखापतींसाठी १ लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय खर्च समाविष्ट असणार आहे.

## मंत्री-आमदारांच्या महाविद्यालयाचे प्रवेश थांबवले

### दानवे, मुंडे, सुळे, टोपे यांच्या शिक्षण संस्थांचा समावेश



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार अधिष्ठाता मंडळाने भौतिक सुविधा नसलेल्या चार जिल्ह्यांतील नामांकित ११३ महाविद्यालयांतील पदव्युत्तरचे प्रवेश थांबविण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. प्रवेश थांबविलेल्या महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह मंत्री, आमदार, माजी मंत्र्यांच्या संबंधित शिक्षण संस्थांचा समावेश आहे. प्राध्यापकांची नियुक्ती न करणे, कागदोपत्री नियुक्ती केल्यानंतर संबंधितांना वेतन न देणे, बायोमेट्रिक हजेरीसह भौतिक सुविधा नसताना पदव्युत्तर अभ्यासक्रम संबंधित म हाविद्यालये चालवित होती. त्याची तीन सदस्यीय समितीने तपासणी केल्यानंतर बोगसपणा उघडकीस आला.

विद्यापीठाच्या विद्यापरिषदेसह व्यवस्थापन परिषदेने 'नॅक' मूल्यांकन न केलेल्या म हाविद्यालयांतील पदव्युत्तरचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, राजकीय क्षेत्रातील कार्यरत शिक्षण संस्थाचालकांनी 'नॅक'चे कामकाज बंद असल्याचे कारण देत शासनाकडे मुदतवाढ मागितली. त्यानुसार शासनाने 'नॅक' नसलेल्या महाविद्यालयांना सहा महिने म ुदतवाढ दिली. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने संलग्न महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या भौतिक सुविधांची समितीमार्फत पाहणी करण्यात आली.

तीन सदस्यीय समितीने तपासणी केल्यानंतर बोगसपणा उघडकीस

छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार अधिष्ठाता मंडळाने भौतिक सुविधा नसलेल्या चार जिल्ह्यांतील नामांकित ११३ महाविद्यालयांतील पदव्युत्तरचे प्रवेश थांबविण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. प्रवेश थांबविलेल्या महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह मंत्री, आमदार, माजी मंत्र्यांच्या संबंधित शिक्षण संस्थांचा समावेश आहे.प्राध्यापकांची नियुक्ती न करणे, कागदोपत्री नियुक्ती केल्यानंतर संबंधितांना वेतन न देणे, बायोमेट्रिक हजेरीसह भौतिक सुविधा नसताना पदव्युत्तर अभ्यासक्रम संबंधित महाविद्यालये चालवित होती. त्याची तीन सदस्यीय समि तीने तपासणी केल्यानंतर बोगसपणा उघडकीस आला.

### कोणत्या जिल्यातील किती महाविद्यालयांचे प्रवेश थांबविले?

छ. संभाजीनगर ७९
जालना ४०
बीड ४४
धाराशिव २४

विद्यापीठाने कोणाच्या कॉलेजांचे प्रवेश रोखले?

१. हरिभाऊ बागडे
संत सावतामाळी महाविद्यालय, फुलंब्री
२. चंद्रकांत पाटील
आर.पी.महाविद्यालय, धाराशिव
३. पंकजा मुंडे,धनंजय मुंडे
वैजनाथ महाविद्यालय,परळी
४. रावसाहेब दानवे
मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन
५. सुप्रिया सुळे
मौलाना आजाद शिक्षण संस्था, कासेल
६. सतीश चव्हाण, प्रकाश साळुंके
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची ५ महाविद्यालये
७. माजी मंत्री राजेश टोपे
मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना
८. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर
आदर्श शिक्षण संस्था,बीड
९. माजी मंत्री बसवराज पाटील
माधवराव पाटील महाविद्यालय,मुरुम
१०. माजी मंत्री राणा जगजीतसिंह
तेरणा महाविद्यालय,धाराशिव
११. माजी मंत्री मधुकर चव्हाण
नळदुर्ग महाविद्यालय, धाराशिव

## मुंबई महापालिकेत ६००० कोटींच्या टेंडर फिक्सिंगमध्ये भाजपचा हात? मनसेचा स्फोटक आरोप!

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई म हानगरपालिकेच्या तब्बल ६००० कोटी रुपयांच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या टेंडर प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. या प्रक्रियेमध्ये भाजप नेत्यांच्या संबंधीत कंपन्यांना झुकते माप दिलं गेलं, असा दावा त्यांनी केला असून, विशेष तपास पथक आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या मार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

संदीप देशपांडे म्हणाले की, ''या संपूर्ण निविदा प्रक्रियेमध्ये भाजपशी संबंधित असलेल्या कंपन्यांना सरस ठरवण्यासाठी अटी शर्ती पद्धतशीरपणे रचल्या गेल्या. यामध्ये भाजपचा गुजरातमधील राज्यसभा खासदाराचे कनेक्शन असल्याचा आरोप देशपांडे यांनी केला. या खासदाराचा मुलगा सनी पांड्या हा बीएमसीच्या अधिकाऱ्यांच्या केबिनबाहेर तो सातत्याने दिसतो. हे योगायोग नाहीत, हे संगनमत असल्याचा आरोप त्यांनी केला.

''जे पहारेकरी होते, तेच आता तिजोरी लुटायला निघालेत का?'' असा सवाल करत संदीप देशपांडे यांनी भाजपवर हल्लाबोल केला. त्यांनी सांगितलं की, ''सनी पांड्याचं नाव घेतल्यावर आम्ही थोडा रिसर्च केला. ते गुजरातमधून राज्यसभेत गेलेल्या भाजप खासदारांचे पुत्र आहेत. त्यामुळे आता हे स्पष्ट होतंय की टेंडरमध्ये भाजप कनेक्शन आहे.''

संदीप देशपांडे यांनी म्हटले की, 'निविदांच्या अटी अशा प्रकारे ठरवल्या गेल्या आहेत, ज्या एक विशिष्ट कंपनीच्या फायद्याच्या आहेत आणि हे अधिकारी आणि वरिष्ठ यंत्रणांच्या संमतीशिवाय शक्य नसल्याचा दावा त्यांनी केला. संदीप देशपांडे यांनी म हापालिका आयुक्त, नगरविकास खाते आणि मुख्यमंत्र्यांकडे याची चौकशी करण्याची मागणी केली.

# ...अन्यथा तलाठ्यांना पगार मिळणार नाही, हजेरीसाठी तलाठी ते महसूलच्या अधिकाऱ्यांना फेस ॲप नोंदणी बंधनकारक!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महसूल विभागानं महसूल विभागातील कर्मचाऱ्यांसाठी एक मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळं महसूल विभागातील तलाठी ते कर्मचारी, अधिकारी यांना दररोज कार्यालयामध्ये हजेरी लावणं बंधणकारक असणार आहे. याचाच एक भाग म्हणून महसूल विभागातील कार्यालयामध्ये फेस रेकग्निशन ॲप आणला जाणार आहे. या ॲपवर नोंदणी झाली, तरच या कर्मचाऱ्यांना त्या दिवसाचा पगार मिळणार, अन्यथा फेस ॲपवर नोंदणी नसल्यास पगार मिळणार नाही, असा शासन आदेश लवकरच जारी करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

दरम्यान, गेल्या काही दिवसापासून राज्याचा जिथून कारभार चालतो, त्या मंत्रालयात सुद्धा काही दिवसापूर्वी अधिकारी, कर्मचारी यांना फेस रिडींग सिस्टीम बसविण्यात आली आहे. मंत्रालयात फेस रिडींग केल्यानंतर तुम्हाला प्रवेश मिळतो. फेस रिडींगची प्रणाली मंत्रालयात आल्यानंतर आता ही महसूल विभागातील कर्मचारी, अधिकारी आणि तलाठी यांच्यासाठी लागू करण्यात येणार आहे. महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना दररोज कार्यालयात जाऊन आपली फेस रिडींग नोंदणी करावी लागणार आहे. तरच त्यांची हजेरी लागेल आणि त्या दिवसाची उपस्थिती असल्याची नोंद होईल. नाहीतर नोंद होणार नाही. दरम्यान, केंद्र सरकारने महसूल विभागातील कर्मचाऱ्यांसाठी फेस ॲप आणि जिओ-फेन्सिंग प्रणाली बंधनकारक असल्यानं कर्मचाऱ्यांची हजेरी आता कार्यालयातूनच नोंदवली जाणार आहे, असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

दुसरीकडे, महसूल मंत्र्यांकडून रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर फेस रिडींग अनिवार्य करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, तलाठी, कर्मचारी ते उपजिल्हाधिकाऱ्यापर्यंत सर्वांनाच फेस ॲपवर नोंदणी करणं बंधनकारक आहे. ज्या गावात, शहरात, जिल्ह्यात नोकरी करत आहे. त्या लोकेशनवर जात फेस ॲपवर नोंदणी करणं बंधनकारक आहे. तर फेस ॲपवर नोंदणी न झाल्यास तो



कर्मचारी, अधिकारी किंवा तलाठी गैरहजर असल्याचं ग्राह्य धरण्यात येईल, असंही बावनकुळेंनी सांगितलं.

## कणेकर गेले ; खुमासदार लेखणी थंडावली

महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, स्तंभ लेखक शिरीष कणेकर यांचा आज स्मृतिदिन. २५ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वांना धक्का बसला होता कारण ते असे अचानक निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते कारण त्यांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी लिहिलेले लेख वर्तमानपत्रात छापून आले होते. माझ्यासाठी तर तो खूप मोठा धक्का होता कारण ते माझे सर्वात आवडते लेखक होते. त्यांची जवळपास सर्वच पुस्तके मी वाचून काढली आहेत. वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचूनच मी स्तंभलेखनाकडे वळलो. त्यांच्या लेखाचा विषय माझा सर्वात आवडीचा विषय. माझाच कशाला आज जे चाळीशी – पन्नाशीत आहे त्या सर्वांचा आवडीचा विषय ते आपल्या लेखणीतून खुमासदारपणे हाताळत आणि तो विषय म्हणजे चित्रपट आणि क्रिकेट. वर्तमान पत्रात त्यांचे चित्रपट आणि क्रिकेटवर लेख छापून आले की ते झटक्यात वाचून संपवणे आणि त्यावर तासनतास चर्चा करणे हा आमच्या मित्र मंडळींचा आवडता छंद. त्यांच्यामुळेच आम्हाला जुन्या काळातील कुंदनलाल सैगल, दिलीप कुमार, राज कुमार, अशोक कुमार, राज कपूर, शम्मी कपूर, देवानंद या अभिनेत्यांची ओळख झाली. तसेच पन्नास ते ऐंशी च्या दशकातील क्रिकेटपटूंची ओळख झाली. केवळ अभिनेते, अभिनेत्री आणि क्रिकेटरच नव्हे तर हिंदी सिनेसंगीत हा देखील त्यांच्या लेखनाचा आवडीचा विषय होता. अतिशय अभ्यासपूर्ण, खुसखुशीत आणि विनोदीशैली हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य. अतिशय खुसखुशीत विनोदी शैलीत ते लिहित असल्याने तरुण वर्ग त्यांचा मोठा वाचक बनला. तरुण मुलांचे ते आवडते लेखक होते. तरुण मुले कट्ट्यावर बसून ज्या प्रमाणे गप्पा मारत अगदी तसेच त्यांचे लेखन होते त्यामुळेच त्यांचा सर्वाधिक वाचकवर्ग हा तरुण होता. वर्तमानपत्रात लेख लिहून स्तंभलेखक म्हणून नावारूपास आलेल्या शिरीष कणेकर यांनी पुढे अनेक पुस्तके लिहिली. यादो की बारात, शिरीषासन, सिनेमाबाजी, मुद्दे आणि गुद्दे, चहाटळकी, सुरपारंब्या, सिनेमगिरी, लागाव बत्ती, कणेकरी, चिमटे आणि गालगुच्चे, आसपास, मेतकूट, चित्ररूप, कल्चर – वल्हचर असे त्यांचे विविध वर्तमानपत्रातील स्तंभ लेखन गाजले. गाये चला जा, यादो की बारात, एक्केचाळीस, गोळी मार भेजे में, गोतावळा, कुरापत, मखलाशी, फटकेबाजी, पुन्हा यादों की बारात, टिवल्या – बावल्या, चंची, चापट पोळी, डॉलरच्या देशा, एकला, रहस्यवल्ली, सुरपारंब्या, क्रिकेटवेध, नट – बोलट, बोलपट, सिनेमा डॉट कॉम ही त्यांची पुस्तके खूप लोकप्रिय झाली. शिरीष कणेकर यांनी लेखनासोबत क्रिकेट व चित्रपटावर स्टॅण्ड अप शो देखील केले. माझी फिल्लमबाजी, फटकेबाजी, .... आणि पुन्हा कणेकर हे त्यांचे स्टँड अप शो खूप लोकप्रिय झाले. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले पण वाचकांच्या मनात त्यांचे जे स्थान होते ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ होते. कणेकर गेले आणि खुमासदार लेखणी थंडावली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या खुमासदार लेखनाने तरुण वाचकांच्या मनात आगळे स्थान निर्माण करणारा हा अवलिया लेखक आज आपल्यात नाही हे मन मानायला तयार नाही. शिरीष कणेकरांची फिल्लमबाजी, फटकेबाजी पुन्हा अनुभवता येणार नाही याची खंत वाटते. असो नियतीने जे मांडून ठेवले आहे ते स्वीकारावेच लागेल. शिरीष कणेकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# शेतकऱ्यांचा सातबारा कोरा आणि इतर मागण्या पूर्ण होई पर्यंत आम्ही शांत बसणार नाही : बच्चू कडू

## प्रहारचे ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर :** शासनाने दिलेले आश्वासन पूर्ण करून शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी तसेच इतर मागण्या तात्काळ पूर्ण करावे यासाठी आम्ही लढा देत आहोत कर्जमाफी व मागण्या पूर्ण होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही यापुढेही तीव्र आंदोलन करू असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक माजी मंत्री बच्चू कडू यांनी शासनाला दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांश बोलताना ते म्हणाले की, राजकीय आंदोलन करायला काही वाटत नाही. मात्र, शेतकऱ्याचा आंदोलन करायला मोठ कष्ट लागतात. मच्छीमार, दुग्ध उत्पादित शेतकरी, शेतकरी कोणीही सुरक्षित नाही. फार मस्त पर्याय कृषीमंत्री यांनी दिला आहे. पीकपाणी चांगले आहे, असे फडणवीस म्हणाले. ज्वारीचा हमीभावापेक्षा कमी भावाने विकावे लागत आहे. शेतकरी आर्थिक दृष्ट्या डबघाईस आला आहे. ही लढाई श्रीमंता विरोधात लढत आहे.कर्जमाफी आणि इतर मागण्या पूर्ण होई पर्यंत आम्ही शांत बसणार नाही. आता यापुढे तारीख न सांगता मंत्रालयात मेंढरे घेऊन घुसू, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना दिला आहे.



शेतकरी कर्जमाफीसाठी प्रहारचे चक्काजाम आंदोलन

**बुलढाणा :** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह शेतमजूर, दिव्यांग आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यासाठी बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. त्यांच्या प्रहार संघटनेने आज राज्यभरात चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. ''शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा'' या मुख्य मागणीसाठी बच्चू कडूंनी विदर्भात पदयात्रा काढली होती. या यात्रेदरम्यानच आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली. आता सरकारला दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी रस्त्यावरची लढाई सुरू केली आहे. यामध्ये २४ जुलै रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष निलेश घोंगे यांच्या नेतृत्वात बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते खामगाव राज्यमहामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील कनारखेड येथे प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी २४ जुलै रोजी चक्काजाम आंदोलन करण्यात आले आहे. माजी आमदार बच्चू कडू यांच्या आदेशान्वये हे आंदोलन करण्यात आले.खामगाव-अकोट या महामार्गावर मोठ्या संख्येने शेतकरी व प्रहार कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. प्रहारचे जिल्हा उपाध्यक्ष निलेश घोंगे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.राज्यभरात आज प्रहार संघटनेने शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी आणि अन्य घटकांच्या न्याय्य मागण्यांसाठी चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनात बुलढाणा प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश काकडे यांच्यासह प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी रास्तारोको करत घोषणाबाजी केली.

### टेंभुर्णा फाट्याजवळ प्रहारचे चक्काजाम आंदोलन

**खामगाव :** तालुक्यातील टेंभुर्णा फाट्याजवळ राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा तसेच दिव्यांग आणि विधवांचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत या मागणीसाठी प्रहार संघटनेकडून चक्काजाम आंदोलन करण्यात आले. राज्यातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा यासाठी अन्नत्याग आंदोलन झाले. पायी यात्रा काढली. मात्र राज्य सरकारने याबाबत कोणताच निर्णय घेतला नाही. आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. याबाबत सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग संस्थेच्या वतीने प्रहार जनशक्ती संघटना जिल्हा संपर्कप्रमुख गजानन लोखंडकार यांच्या नेतृत्वात करण्यात आले. शेतीमालाला चांगला भाव भेटत नाही. जर शेतीमालाला चांगला भाव भेटला तर देश सुखी व्हायला वेळ लागणार नाही. मग शेतकरी सरकारकडे कर्जमाफी करा म्हणून कधीच मागणी करणार नाही. पण शेतमालाला चांगला भाव मिळत नाही हे मोठे दुर्दैव आहे. अपंगांना आपल्या विविध मागण्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलन करावे लागते, याच्यासारखे दुर्दैव काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकारने दिव्यांगांच्या पेन्शनमध्ये एक हजार रुपयाची वाढ करून ती आता अडीच हजार रुपये केली आहे. ही संघटनेने दाखविलेल्या ताकदीचे यश आहे. अजूनही आपले अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासाठी आपणास रस्त्यावरची लढाई लढावी लागणार आहे. सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना कर्जमाफी नव्हे तर कर्जमुक्ती द्यावी अशी मागणी सुद्धा आंदोलनकर त्यांच्या वतीने यावेळी करण्यात आली.

# हर्षल पाटलांनी जलजीवन मिशन संदर्भात कोणतेही कंत्राट सांगलीत घेतलेलं नाही; थकबाकीमुळे आयुष्य संपवल्याचा प्रश्नच येत नाही

## जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिली माहिती

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** सांगलीमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या सरकारी कंत्राटदराने आत्म हत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. हर्षल पाटील असं आत्महत्या केलेल्या कंत्राटदाराचं नाव आहे, तर त्याने राज्य सरकारकडून वेळेत बिलं मिळत नसल्याने नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलले असल्याचा आरोप सरकारी कंत्राटदारांच्या संघटनेकडून करण्यात आला आहे. हर्षल पाटील वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी गावचा आहेत. राज्य सरकारकडून केलेल्या कामाचा मोबदलाच वेळेत मिळाला नसल्यानेच त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरलं आहे, त्यावरती आता सांगली जिल्हा परिषदेचे विशेष कार्यकारी अधिकारी यांनी माहिती देत भूमिका स्पष्ट केली आहे.

जलजीवन मिशन संदर्भात कोणतेही कंत्राट सांगलीत घेतलेलं नाही

हर्षल पाटील यांनी जलजीवन मिशन संदर्भात कोणतेही कंत्राट सांगलीत घेतलेलं नाही. त्यामुळे जलजीवन मिशनच्या कामाची थकबाकीमुळे आत्महत्या केल्याचा कोणता प्रश्नच येत नाही, अशी भूमिका सांगली जिल्हा परिषदेचे विशेष कार्यकारी अधिकारी यांनी घेतली आहे.

उपरोक्त विषयान्वये दि. २३/७/२०२५ व दि. २४/७/२०२५ रोजी वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रात व इतर समाजमाध्यमांवर हर्षल अशोक पाटील मु. तांदूळवाडी ता. वाळवा जि. सांगली यांनी जल जीवन मिशन अंतर्गत केलेल्या कामांची देयके न मिळाल्याने आत्महत्या केल्याची बातमी प्रसारीत झाली आहे. त्या अनुषंगाने खुलासा सादर करणेत येतो की, हर्षल अशोक पाटील यांनी जिल्हा परिषद सांगली कडील जल जीवन मिशन अंतर्गत कोणत्याही कामाचा करारनामा केलेला नाही, त्यामुळे त्यांचा जल जीवन मिशन अंतर्गत देयक प्रलंबित असण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असं त्यांनी म्हटलं आहे.

गुलाबराव पाटील हर्षल पाटीलबाबत बोलताना म्हणाले...

हर्षल पाटील हा अभियंता असून तो मु. तांदूळवाडी ता. वाळवा जि. सांगली या गावचा अभियंता आहे. अभियंत्याने आत्महत्या केली असून याप्रकरणी त्या अभियंत्याच्या नावावर कुठलंच काम नाही आहे. त्या योजनेवर कुठलं बिल पेंडिंग नाही. एखाद्या वेळेस त्यांनी हे काम घेतलं असावं, मात्र या बिलाची कुठेच नोंद नाही, मी स्वत: अधिकाऱ्यांची संपर्क केला असून त्यांनी स्वत: काम केलं असेल तर याबाबत काही माहीत नाही, असंही गुलाबराव पाटलांनी म्हटलं आहे.

कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता, छोटे कंत्राटदारांनी घेतली

महाराष्ट्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत राज्यात शासनाने हर घर जल ही योजना सुरू केली. या माध्यमातून सरकारी कामे काढली गेली होती. सदर कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता, छोटे कंत्राटदार यांनी घेतली होती. जवळपास कामे पूर्णही केली. परंतु कंत्राटदार यांनी पुर्ण केलेल्या कामांचे व तसेच केलेल्या कामांचे देयके देण्यासाठी शासनाकडे जवळपास १ वर्षांपासून निधीच उपलब्ध नाही तसेच केंद्राने ही निधी देऊ शकत नाही असे पत्र राज्य शासनास धाडले आहे.

कर्जाच्या पैशासाठी लोकांचा तगादा

हर्षल पाटील यांनी स्वत:च्या शेतात जाऊन गळफास घेऊन आत्म हत्या करून आपलं जीवन संपवलं आहे, त्यांचे शासनाकडे जवळपास




१.४० कोटींचे देयके प्रलंबित आहेत. तसेच सावकार व इतर आर्थिक लोकांकडून त्यांनी जवळपास ६५ लाखांचे कर्ज घेतले होते. तसेच गेल्या अनेक दिवसांपासून तो त्यांच्या मित्रांना मी आत्महत्या करतो हे शासन पैसे देत नाही इतर लोक मला पैशासाठी तगादा लावत आहेत वडिलांना काय सांगू नका असे बोलत असे. हर्षल हाच घरात मोठा होता तसेच त्यांच्या पाठीमागे पत्नी, एक पाच वर्षांची मुलगी, दोन लहान भाऊ व आई वडील असा परिवार आहे. सदर घटना अत्यंत धक्कादायक आहे, त्यांच्या परिवाराला शासनाने तातडीने आर्थिक मदत व प्रलंबित देयके देऊन सदर त्यांच्या नावे असलेले कंत्राटदार म्हणून असलेले शासकीय नोंदणीकरण त्यांच्या पत्नीच्या नावे वर्ग करावेच लागेल, शासनाने कंत्राटदारांची सर्व विभागाकडील देयके तातडीने देण्याची व्यवस्था करावी अन्यथा आपण असे नवयुवक,उद्योजक, कंत्राटदार आपले जीवन संपवून टाकतील व आपले कुटुंब नाहक आर्थिक अडचणीत येतील याची शासनास फार मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणीपुरवठा संघटना राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे व सर्व पदाधिकारी यांनी शासनास इशारा दिला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### लालपरी व दुचाकीचा अपघात महिला ठार डोणगाव येथील घटना



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** एसटी बस व मोटरसायकल अपघातात महिला जागीच ठार झाली धक्कादायक घटना समोर आली आहे. सदर घटना २४ जुलै रोजी येथून जवळच असलेल्या मादणी फाट्याजवळ दुपारी अडीच वाजेदरम्यान घडली. सदर अपघातात संजीवनी चव्हाण या महिलेचा मृत्यू झाला. प्राप्त माहितीनुसार डोणगाव येथील प्रफुल मिसाळ एम. एच. २१ बी.यू. ८९५९ या मोटरसायकलवर संजीवनी अरुण चव्हाण व मंजुळा अरुण चव्हाण या दोन महिलांना डोणगावकडे घेऊन जात होते. दरम्यान पुसद वरून जळगाव खान्देशकडे जाणाऱ्या एम. एच. १४ एल. एक्स ७६१० एसटी बसच्या डाव्या बाजूला मागील दिशेने धडकल्याने अपघात घडला. या अपघातात गाडीवर बसलेल्या संजीवनी चव्हाण हिचा जागीच मृत्यू झाला. तर, प्रफुल मिसाळ व मंजुळा चव्हाण किरकोळ जखमी झाल्या असून सदर घटनेबाबत पोलिसात गुन्हा नोंद असून व पुढील तपास डोणगाव पोलीस करीत आहेत

### उच्चांकी दरवाढीनंतर आज सोनं झालं स्वस्त, दागिने खरेदी करण्यापूर्वी वाचा २२ कॅरेटचे दर

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत होती. सोनं एक लाखांच्या पार गेलं होतं. मात्र आता सोन्याच्या दरात मोठी घसरण झाल्याचे पाहायला मिळतेय. शर्ऎ वर सोन्याच्या दरात घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात अमेरिका-ईयू ट्रेड डीलच्या अपेक्षेमुळं सुरक्षित गुंतवणुकीची मागणी घटली आहे. अमेरिका आणि युरोपीय यूनियन (एळ) दरम्यान १५ टक्के टॅरिफ डीलजवळपास पोहोचल्यामुळं सुरक्षित गुंतवणीची मागणी कमजोर होताना दिसत आहे. तर, दुसरीकडे चांदीच्या किंमतीत मोठी उसळी असल्याचे पाहायला मिळतेय. आज सोनं २४ कॅरेट १३६० रुपयांनी घसरले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे दर घसरले आहेत. स्पॉट गोल्ड १.३ टक्क्याने घसरून ३,३८७.६७ प्रति औंसवर पोहोचले आहे. यूएस गोल्ड फ्युचर्सदेखील १.४ टक्क्यांची घसरणीनंतर ३,३९६.९ वर स्थिरावले होते. मार्केट एक्सपर्टनुसार, अमेरिका आणि जपान यांच्यात झालेल्या डीलमुळं गुंतवणुकदार जोखीम पत्करत आहेत. त्यामुळं सोन्याच्या दरात घट होत आहे. भारतीय बाजारपेठेत २४ कॅरेट सोन्याचे दर एक लाखांच्या पार पोहोचले आहेत.

आज २४ कॅरेट सोन्याच्या दरात १,३६० रुपयांची घट झाली असून प्रतितोळा सोनं १,००,९७० रुपयांवर पोहोचलं आहे. तर २२ कॅरेट सोन्याच्या दरात १२५० रुपयांची घट झाली असून प्रतितोळा सोनं ९२,५५० रुपयांवर पोहोचले आहे. १८ कॅरेट सोन्याच्या दरात १,०२० रुपयांची घट झाली असून ७५,७३० रुपयांवर पोहोचले आहे.

### मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, आरोपींची सुटका...

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत २००६ साली लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली होती. हायकोर्टाच्या या निर्णयाला आव्हान देत महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. आज गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी होती. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. न्यायालयाने बॉम्बस्फोटातील ११ आरोपींच्या सुटकेच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व आरोपींना नोटिस जारी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या मकोका इत्यादींवरील निर्णयाला स्थगिती दिली आहे. म्हणजेच १२ आरोपींच्या सुटकेच्या आदेशाला स्थगिती नसणार. त्याम ळं १२ आरोपींना दिलासा कायम आहे. सर्व आरोपींना पुन्हा जेलमध्ये जावं लागणार नाही. सर्व आरोपींना त्यांचं म्हणणं मांडावे लागणार आहे.

# श्री संत गजानन महाराज पालखीचे बिबी शहरात हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये भव्य जंगी स्वागत

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





**बिबी :** बिबी हद्दीमध्ये पालखीचे आगमन होताच फटाक्याचे आतषबाजी, रांगोळी,पुष्पदृष्टी करत श्री च्या पालखीचे व सोबत असणाऱ्या वारकऱ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. श्री च्या पालखीसोबत ७०० वारकरी सहभागी आहे.गण गण गणात बोते विठ्ठल नामाचा जयघोष करत वारकरी व हजारो भक्त दंग होऊन गेल्याचे पाहायला मिळाले. विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या श्री क्षेत्र शेगांव येथील श्री संत गजानन महाराज यांची पालखी दरवर्षी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला मार्गस्थ होत असते,श्री ची पालखी सध्या परतीच्या मार्गावर असून पालखीचे बिबी हद्दीमध्ये दुपारनंतर ५ वाजेच्या दरम्यान आगमन झाले.

यावेळी बिबी सह परिसरातील विविध मान्यवर यांच्यासह हजारो भाविकांची उपस्थिती होती. दुसरबिड च्या हद्दीपासून शेकडो भाविक पायदळ बिबी शहरापर्यंत दिंडी सोबत दाखल झाले होते. ठिकठिकाणी श्री च्या पालखीचे मोठ्या उत्साहामध्ये स्वागत करण्यात आले.

श्री च्या पालखीसोबत असणाऱ्या वारकऱ्यांची व भक्तांची भोजनाची व्यवस्था बीबी ग्रामस्थांनी केली होती, सतत पडणाऱ्या पावसामुळे भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी गावकऱ्यांच्या वतीने वॉटरप्रूफ मंडपाची व्यवस्था करण्यात आली

वसंतराव नाईक कनिष्ठ महा विद्यालयांमध्ये पालखी मुक्कामासाठी थांबली होती. वसंतराव नाईक महाविद्यालयामध्ये पालखीचे आगमन होताच परिसरातील हजारो भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संदीप पाटील,पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर शिंदे, नापोका अरुण सानप, यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.ता.२५ जुलै रोजी सकाळी श्री ची पालखी किनगाव जटटू मार्गे लोणार साठी प्रस्थान करणार आहे.

## बीडच्या पाटोदा शहरातील ग्रामीण रुग्णालयासमोर बस व दुचाकीचा भिषण अपघात; पती-पत्नी दोघे ठार

दैनिक आपला विदर्भ



**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या पाटोदा शहरातील ग्रामीण रुग्णालयासमोर अत्यंत भीषण अपघात झाला. भरधाव वेगात आलेल्या बसने दुचाकीवर आलेल्या पती-पत्नींना जोरदार धडक दिली. या अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. पाटोदा तालुक्यातील भाटेवाडी येथील रहिवासी असून, आज पाटोदा येथील बाजार दिवस असल्यामुळे बाजारासाठी येत होते. संबंधित पती-पत्नी दुचाकीवरून जात असताना रुग्णालयासमोर अचानक आलेल्या बसने त्यांना जबर धडक दिली. बस क्रमांक -१४ ७९६२ असा असून बाळु केशव वायकर आणि त्याची पत्नी लता बाळु वायकर हे धडकेनंतर दोघेही रस्त्यावर दूर फेकले गेले. आणि गंभीर दुखापतीमुळे घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. सदरील बस ही नांदेड कडून पुण्याकडे जात असताना समोरून अपघात झाला दोघेही जागेवर ठार झाले.

## लाच घेताना जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यासह एकास अटक; ज्वारी विक्रीच्या देयकासाठी मागितले होते ७० हजार




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** हमीभाव योजनेंतर्गत ज्वारी विक्रीच्या देयकासाठी ७० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या, प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन नंदकिशोर टेकाळे आणि सेवानिवृत्त लेखा निरीक्षक देवानंद गंगाराम खंडाळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २५ हजारांचा पहिला हप्ता स्विकारताना रंगेहात अटक केली. ही कारवाई काल सायंकाळी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय व मुठे ले-आऊट परिसरात करण्यात आली. शेतकऱ्याने हमीभाव केंद्रावर ज्वारी विकल्यानंतर देयक मिळावे आणि भविष्यातही अडथळा न येण्यासाठी टेकाळे यांनी ७० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार संबंधित शेतकऱ्याने एसीबीकडे केली होती. त्यानंतर २१ ते २३ जुलैदरम्यान लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. तडजोडीनंतर ५० हजार रुपये लाचेची रक्कम निश्चित झाली होती. त्यातील २५ हजारांचा पहिला हप्ता खासगी व्यक्ती देवानंद खंडाळे यांच्या मार्फत स्विकारताना त्यांना पंचासमक्ष प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे आणि देवानंद खंडाळे यांच्यावर बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

## ढाणकी येथे सर्व पक्षीय व शेतकऱ्यांनी केला चक्का जाम आंदोलन

दैनिक आपला विदर्भ



**उमरखेड/तालुका प्रतिनिधी :** शेतकरी कर्जमाफीसह अन्य १७ मागण्यांसाठी जात पात धर्म,पक्ष, राजकीय विचार बाजूला ठेऊन कष्टकरी शेतकरी ,शेतमजुर समाज यांनी चक्काजाम आंदोलनामध्ये संपूर्ण ताकतीसह आपला सहभाग नोंदवावा असे आव्हान करताच शेकडो च्या संख्येने शेतकऱ्यांनी चक्काजाम आंदोलन मध्ये सहभाग नोंदवून आज२४ जुलै रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प हार घालून चक्काजाम आंदोलन केले. आंदोलन कर्त्यांनी अर्धा घंटा रोड वर गाड्या अडवून ठेवल्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. यावर बिटरगाव पोलीस स्टेशन ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी आंदोलन करणाऱ्याना स्थानबद्द केले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी स्थानबद्द होत असताना,''ना कुठल्या पक्षाचा झेंडा फक्त शेतकरी बांधवांचा सातबारा कोरा व्हावा हाच एक अजेंडा'', ''जय जवान जय किसान'' चे नारे देत आंदोलन पूर्ण केले.

**आम्ही काय जुआ खेळत नाही? येवढा पैसा आमच्यकडे नाही? आमच्या कडे असता तर आम्ही आत्महत्या केल्या नसत्या?पण राज्याचा कृषी मंत्री सभागृहात शेतकऱ्याच्या जीवन मरणाचा प्रश्न असताना आपल्या मोबाईल वर ऑनलाईन जुआ खेळतो. याच्या विरोधात आम्ही ये दाखवत आहे साहेब! आमच्याकडे जुआ खेळायला पैसा तर नाही पण आम्ही दरवर्षी निसर्गा सोबत जुआ खेळून जीव डावावर लावतो.तुमच्यात जराशी तरी शेतकऱ्यांन साठी तमा असेल! तर शेतकरी बांधवांचा सातबारा कोरा करा.**
**-संतप्त शेतकरी**

## हायड्रा ड्रायव्हरने पोलीस कॉन्स्टेबलला चिरडले, पोलीस कॉन्स्टेबल गणेश पाटील यांचा जागीच मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील महापे मध्ये आज साडेबारा वाजता नवी मुंबई येथील महापे एमआयडीसी येथे एका हायड्रा ड्रायव्हरने रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या ट्रॅफिक कॉन्स्टेबलला चिरडले. ज्यात रहदारीमुळे कॉन्स्टेबल गणेश पाटील त्या ठिकाणी मरण पावले. ड्रायव्हरला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. कॉन्स्टेबलला ताबडतोब वाशी येथील मेट्रोपॉलिटन वाशी नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पुढील तपास पोलिसांचा सुरु आहे.

## सांगली जिल्ह्यात जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या तरुण कंत्राटदाराची शेतात गळफास घेऊन आत्महत्या


### राज्य सरकारकडून वेळेत बिल मिळत नसल्याच्या नैराश्यातून आत्महत्या

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** सांगली जिल्ह्यात जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या तरुण कंत्राटदाराची स्वतः च्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. राज्य सरकारकडून वेळेत बिल मिळत नसल्याच्या नैराश्यातून आत्महत्या केल्याचा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने आरोप केलाय.

हर्षल पाटील (वय ३५) असे आत्महत्या केलेल्या कंत्राटदाराचे नावअसून वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी हे हर्षल पाटीलचे गाव आहे. काल रात्री हर्षलने शेतात जाऊन गळफास घेतल्याचं समोर आलं. हर्षलचे शासनाकडे जवळपास १.४०. कोटींचे देयके प्रलंबित होते तसेच सावकार व इतर आर्थिक लोकांकडून त्याने जवळपास ६५ लाखांचे कर्ज घेतले होते.

हर्षल पाटील यांनी स्वत:च्या शेतात जाऊन गळफास घेऊन आत्महत्या करून आपले जीवन संपवलं आहे त्यांचे शासनाकडे जवळपास १.४० कोटींचे देयके प्रलंबित आहेत. तसेच सावकार व इतर आर्थिक लोकांकडून त्याने जवळपास ६५ लाखांचे कर्ज घेतले होत. तसेच गेल्या अनेक दिवसांपासून तो त्यांच्या मित्रांना मी आत्महत्या करतो हे शासन पैसे देत नाही इतर लोक मला पैशासाठी तगादा लावत आहेत वडिलांना काय सांगू नका असे बोलत असे. हर्षल हाच घरात मोठा होता तसेच त्यांच्या पाठीमागे पत्नी, एक पाच वर्षांची मुलगी, दोन लहान भाऊ व आई वडील असा परिवार आहे . सदर घटना अत्यंत धक्कादायक आहे, त्यांच्या परीवारास शासनाने तातडीने आर्थिक मदत व प्रलंबित देयके देऊन सदर त्यांच्या नावे असलेले कंत्राटदार म्हणून असलेले



शासकीय नोंदणीकरण त्यांच्या सुविद्या पत्नीच्या नावे वर्ग करावेच लागेल, शासनाने कंत्राटदारांची सर्व विभागाकडील देयके तातडीने देण्याची व्यवस्था करावी अन्यथा आपण असे नवयुवक,उद्योजक, कंत्राटदार आपले जीवन संपवून टाकतील व आपले कुटुंब नाहक आर्थिक अडचणीत येतील याची शासनास फार मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणीपुरवठा संघटना राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे व सर्व पदाधिकारी यांनी शासनास इशारा दिला आहे.

# राकाँ. महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे यांच्याकडून जिल्हाध्यक्ष आखाडे यांच्या कार्याचे कौतुक

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी पक्ष संघटक वाढविण्याबाबत तसेच अल्पावधीत केलेल्या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे, महिला प्रदेश उपाध्यक्ष कविताताई मेश्राम यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांचा सत्कार करत त्यांच्या कार्याची कौतुक केले आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी काही महिन्यापूर्वी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारली आहे.त्यानंतर त्यांनी संपूर्ण जिल्हा वर शहरासह ग्रामीण भागात पक्ष संघटन वाढवने चालू केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष संघटन. पक्ष वाढवण्याबरोबरच त्यांनी सामाजिक कार्यातही हिरीरीने भाग घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ध्येय धोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचलो सर्वसामान्यांना राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जोडले आहे नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी संदर्भातही जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी शासन प्रशासन दरबारी पाठपुरावा करून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला होता त्याचबरोबर देशाचे माजी कृषीमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्याकडे मेहकर डोणगाव सिंदखेडराजासह बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मुस्कान गस्त शेतकऱ्यांना

आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी निवेदने देऊन पाठपुरावा केला होता.या संदर्भात माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून डोणगाव संपूर्ण सह जिल्ह्यातील व लगतच्या रिसोड तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली होती. युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी कामाचा सपाटाच लावून पक्ष संघटन वाढवण्यासाठी परिश्रम घेतले आहे त्यांच्या या प्रवेश श्रमामुळे डोणगाव मेहकर या संपूर्ण जिल्ह्यातील युवा वर्ग हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पक्षाशी जुळला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी ताई खडसे व महिला प्रदेश उपाध्यक्ष कविताताई मेश्राम यांनी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांच्या कार्याची कौतुक करत त्यांचा सत्कार केला. तसेच उत्कृष्ट कार्याबद्दल कौतुक केले राष्ट्रवादी काँग्रेस युवा जिल्हाध्यक्ष गोपाल आकडे यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सचिव पंकज पळसकर सह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.



## विविध वृत्त...

### राजस्व मंडळ ढाणकी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न



दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड:** दिनांक २४ जुलै रोजी राजस्व मंडळ ढाणकी (तलाठी कार्यालय) येथे ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'' अत्यंत यशस्वीरित्या संपन्न झाले.

या शिबिरास गावातील व खेड्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन निराधार योजना,उत्पन्न दाखले, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, जातीचा दाखला,आधार अपडेशन, अग्रीस्टेन्ग नोंदणी सेवेचा राजस्व ढाणकी मंडळ यांचे कडून जास्तीत जास्त लाभ घेतला. या वेळी प्रमुख पाऊणे म्हणून ढाणकी नगरपंचायत माजी नगर अध्यक्ष सुरेश जयस्वाल,माजी नगर उपअध्यक्ष जहीर भाई, बिटरगाव पो. स्टेशन ठाणेदार पांडुरंग शिंदे, पोलीस पाटील रमण रावते वआनंदराव चंद्रे उपस्थित होते. तसेच स्थानिक पातळीवरील ढाणकी मंडळ अधिकारी आढाव,ढाणकी खंड १ चे तलाठी भंडारे,ढाणकी खंड २ चे तलाठी जगताप, गांजेगाव तलाठी शिंदे,कृष्णापूर तलाठी इंगळे,सोईट(म ) राहूल भोजने, कोप्रा तलाठी पावडे व महसुल सेवक सैयद इबादूला, अभिलास गायकवाड,आंनद पैठणकर, संघ प्रिया वाघमार भारत सूर्यवंशी मान्यवर ग्रामस्थांच्या सेवेसाठी उपस्थित होते.

या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी यवतमाळ, तहसीलदार उमरखेड, मंडल अधिकारी, व सर्व उपस्थित अधिकाऱ्यांचे नागरिकांनी अभिनंदन केले.

### राज्यातील १.५० लाख साखर कामगारांचे तोंड गोड होणार! पगारवाढीची घोषणा, किती टक्क्यांनी वाढ होणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील साखर कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या दीड लाखांहून अधिक कामगारांना मोठा दिलासा देणारा निर्णय बुधवारी घेण्यात आला. राज्य सहकारी साखर कारखाना संघटनेचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साखर संकुल, मुंबई येथे त्रिपक्षीय समितीची पाचवी बैठक पार पडली. या बैठकीस राज्य सरकारचे अधिकारी, साखर कारखाना मालकांचे प्रतिनिधी तसेच कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निर्णय काय झाला?

दहा टक्के वेतनवाढ देण्याचा महत्त्वाचा निर्णय त्रिपक्षीय समितीने घेतला असून, या निर्णयामुळे कारखाना कामगारांच्या पगारात सरासरी २,६०० २,८०० पर्यंत वाढ होणार आहे. परिणामी, साखर उद्योगावर सुमारे ४१९ रु कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. या बैठकीत १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२९ या कालावधीसाठी दहा टक्के वेतनवाढ लागू करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. कामगार संघटनांच्या दीर्घ मागणीनंतर हा तोडगा निघाला आहे.

ही वेतनवाढ अकुशल कामगारांपासून निरीक्षक पदापर्यंतच्या १२ वेतनश्रेणींना लागू होणार आहे. दरमहा वेतनात २,६२३ रु ते २,७०३ पर्यंत वाढ करण्यात आली आहे. धुलाई भत्ता, घरभाडे भत्ता, वैद्यकीय भत्ता व महागाई भत्त्याचाही समावेश या नव्या करारात करण्यात आला आहे.

मागील कराराची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली होती. त्यानंतर कामगार संघटनांनी आंदोलनाचे हत्यार उपसून ४० टक्के वेतनवाढीची मागणी केली होती. त्याविरोधात कारखाना व्यवस्थापनाने ४ टक्क्यांची ऑफर दिली. वाटाघाटींमध्ये कारखाना प्रतिनिधी ७ टक्क्यांवर ठाम राहिले, तर कामगार संघटना १८ टक्के वाढीवर अडून राहिल्या.

वेतनवाढीवर एकमत न झाल्याने माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली लवाद स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनानंतर दहा टक्के वेतनवाढीवर अंतिम निर्णय झाला. ही माहिती पी. आर. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, या निर्णयामुळे राज्यातील साखर उद्योगात काम करणाऱ्या हजारो कामगारांच्या जीवनमानात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. तसेच कामगार-व्यवस्थापन संबंध अधिक मजबूत होण्यासही मदत होईल.

## कन्फर्म! रणबीर कपूर स्टारर रामायणमध्ये हा मराठमोळा अभिनेता साकारणार महत्त्वाची भूमिका

**मुंबई/प्रतिनिधी :** नितेश तिवारी आणि नमित मल्होत्रा यांच्या ४००० कोटींच्या रामायण सिनेमाची चर्चा केवळ भारतच नाहीतर संपूर्ण जगभरात सुरू आहे. गेल्या बऱ्याच दिवसांपासून रामायण चर्चेत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, या सिनेमात बॉलिवूड सुपरस्टार रणबीर कपूर प्रभू श्रीरामाच्या भूमिकेत दिसणार आहे. तर, साऊथ सुपरस्टार साई पल्लवी सीता मातेची भूमिका साकारणार आहे. गेल्या काही दिवसांत सिनेमाची स्टारकास्ट, त्यातल्या महत्त्वाच्या भूमिकांबाबत खुलासा झाला होता. अशातच भगवान रामचा धाकटा भाऊ, भरतची भूमिका कोण साकारणार? याबाबत चर्चा सुरू होत्या. पण, आता भरतच्या भूमिकेबाबतही महत्त्वाचा खुलासा झाला असून या भूमिकेत दिसणाऱ्या अभिनेत्याचं नाव निश्चित झालं आहे. बहुचर्चित रामायण सिनेमात प्रभू श्रीरामांचा भाऊ भरताची भूमिका एक मराठमोळा अभिनेता साकारणार आहे. एका मुलाखतीत बोलताना अभिनेत्यानं स्वतः याबाबत खुलासा केला आहे. रामायण हा महत्त्वाचा प्रोजेक्ट असून तो जागतिक स्तरावरही महत्त्वाचा ठरेल, असं मराठमोळ्या अभिनेत्यानं सांगितलं आहे. रामायण सिनेमात भरताच्या भूमिकेत झळकणाऱ्या मराठी अभिनेत्याचं नाव आहे, आदिनाथ कोठारे याआधीही या भूमिकेसाठी आदिनाथ कोठारेच्या नावाची जोरदार चर्चा रंगली होती, पण त्यावेळी कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नव्हती. आता एका मुलाखतीत बोलताना त्यानं स्वतःच याची पुष्टी केली आहे.

## पत्रकाराला शिवीगाळ करून जीवे मारण्याची दिली धमकी



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/जिल्हा प्रतिनिधी :** पत्रकार हे समाजाचा आरसा असल्याचे सांगितले जाते. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ देखील बोलले जाते. परंतु वारंवार पत्रकारावर भ्याड हल्ले व अपमानास्पद वागणूक होत असल्याने अनेकांची पत्रकारिता धोक्यात असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. पत्रकाराचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी या उद्देशाने दिग्रस येथे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

दिग्रस शहरातील शिवाजी चौकापासून दुचाकी गाडीने पत्रकार मानोरा चौकाकडे जात असताना अचानकपणे पाठलाग करून दोन चाकी वाहन घेऊन सुनील राठोड या व्यक्तीने अश्लील भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे सदर भयभीत झाल्या पत्रकाराने पोलीस स्टेशन गाठून आप बीती सांगितल्यानंतर भारतीय दंड संहिता २९६,३५१(२)३५१(३) नुसार धमकी व अश्लील शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले.


सदर काल दिनांक २३ जुलै सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान गाडीने पाठलाग करून शिवाजी चौक ते मानोरा चौक दरम्यान ट्रेंड मॉल जवळील सदर प्रकरण सिसी टीव्हीत कैद झाले आहे. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांमार्फत व महसूल प्रशासनामार्फत असे कृत्य करणाऱ्यांवर कठोर शासन होईल का यावर सगळ्यांचे लक्ष लागले आहे तरी या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार वैजनाथ मुंडे करीत आहे

## मन सुन्न करणारी घटना... एकीकडं पावसाची सर, दुसरीकडं शेतकरी दाम्पत्यानं गळ्यात अडकवला दोर; गावकरीही शॉक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतेचा विषय बनला असून नापिकी आणि कर्जबाजारीला कंटाळून शेतकरी आपलं जीवन संपवत आहे. राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी, या मागणीसाठी विरोधकांकडून, शेतकरी संघटनांकडून आवाज उठवला जात आहे. तर, दुसरीकडे प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनीही आंदोलन सुरू केले असून ते मंत्रालयाकडे धाव घेत आहेत. अशातच बुलढाणा () जिल्ह्यातून अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावणारी शेतकरी आत्महत्येची घटना समोर आली आहे. शेतकरी दाम्पत्याने आपल्याच शेतात गळफास घेऊन जीवनयात्रा संपवल्याची दुःखद घटना घडली.





चिखली तालुक्यातील भरोसा येथील शेतकरी दांपत्याने शेतातच निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. पती आणि पत्नीचे मृतदेह शेतातील झाडाला लटकल्याचं पाहून समाजमन सुन्न झालंय, तर गावावर शोककळा पसरलीय. येथील शेतकरी गणेश थुट्टे (वय ५५ वर्षे) आणि पत्नी रंजना थुट्टे (वय ५० वर्ष) अशी आत्महत्या केलेल्या शेतकरी दाम्पत्याची नावे असून दोघांनी शेजारी-शेजारीच असलेल्या निंबाच्या झाडाला गळफास घेतला. थुट्टे दाम्पत्याने हे टोकाचं पाऊल का उचललं, त्यांच्या आत्महत्येचे नेमकं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, सातत्याने शेतीत होणारे नुकसान आणि हुमणी अळीने ते चिंतेत होते, त्यातचून आर्थिक विवंचनेतून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचलल्याची चर्चा गावपरिसरात होत आहे.

दरम्यान, एकीकडे रिमझिम पावसाच्या सरी कोसळत असतानाच ही घटना उघडकीस आल्यानंतर अंढेरा पोलिस घटनास्थळी पोहचले आहेत. मृतांचे पार्थिव खाली उतरवून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मागेल त्याला सौर पंप योजनेला महावितरणचा खोडा; विज जोडणी असलेल्या शेतकऱ्यांना सौर पंप नाहीच, जिल्ह्यातील शेकडो शेतकरी प्रतीक्षेत

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड /प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा व्हावा व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे या हेतूने महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा गाजावाजा करून मागेल त्याला सौर कृषी पंप योजना सुरू केली आहे परंतु महावितरण कडून या शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेला हरताळ फसल्या जात आहे ज्या शेतकऱ्या च्या नावे वीज जोडणी आहे अशा शेतकऱ्यांना या योजनेपासून वंचित ठेवल्या जात आहे त्यामुळे शेकडो शेतकरी लाभार्थी हिस्सा भरून ही सौर पंपाच्या प्रतीक्षेत आहेत २५ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरणाच्या नागपूर प्रादेशिक विभागाचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले होते.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सरकारने २८ जून रोजी अर्थसंकल्पात मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना शेतकऱ्यांसाठी सुरू केली आहे सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा व्हावा व त्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने सदर योजना सुरू करण्यात आली आहे या योजनेमध्ये शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के लाभार्थीचा भरून सौर पॅनल पंप असा संपूर्ण संच मिळतो अनुसूचित जाती व जमाती च्या शेतकऱ्यांना केवळ पाच टक्के लाभार्थी भरावा लागतो बाकी रक्कम संबंधित कंपन्यांना केंद्र सरकार व राज्य सरकारकडून दिल्या जाते ही योजना सुरू होताच विजेच्या कटकटी पासून सुटका होणार म्हणून हजारो



शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज दाखल करून लाभार्थी हिस्सा भरला आहे राज्यभरातून या योजनेला शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला या योजनेविषयी बोलताना तत्कालीन ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते शेतकऱ्यांची विजेची समस्या कायम सोडण्यासाठी तसेच शेतकऱ्यांनी दिवसा वीज उपलब्ध व्हावी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे या हेतूने राज्य सरकारने मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना सुरू केली आहे या योजनेअंतर्गत नऊ लाख सौर पंप मंजूर करण्यात आले आहेत त्यामुळे या योजनेचा लाभ सिंचनाखाली जमील असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना मिळणार आहे तसेच हा कोटा संपल्यानंतर राहिलेल्या शेतकऱ्यांनाही सौर पंप देण्यात येणार आहेत परंतु मागील सहा महिन्यापासून या योजनेला खिळ बसली आहे शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेला महावितरण कडूनच हरताळ फासल्या जात आहे ज्या शेतकऱ्याच्या नावे कोटेशन आहे अशा शेतकऱ्यांना या योजनेपासून वंचित ठेवल्या जात आहे त्यामुळे लाभार्थी हिस्सा भरूनही शेकडो शेतकरी सौर पंपाच्या प्रतीक्षेत आहेत अडचणीत सापडलेले शेतकरी दररोज महावितरण कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत परंतु वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाकडून या शेतकऱ्यांना कुठलेही मार्गदर्शन केल्या जात नाही त्यामुळे शेकडो शेतकरी लाभार्थी हिस्सा परत घेण्याच्या तयारीत आहेत २५ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरणच्या नागपूर प्रादेशिक विभागाचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी या योजनेत शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते त्यांच्यासह सर्वच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना विसर पडल्याचे निदर्शनास येत आहे.